RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ८, अंक २१] मंगळवार, मार्च १५, २०२२/फाल्गुन २४, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च, २०२२.

**अधिसूचना**

**आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६.**

क्रमांक आरजीएन-२०२०/४८१/प्र.क्र.२४५/एम-१(धोरण).— ज्याअर्थी, भारत सरकारने, त्याचे कार्यालयीन ज्ञापन, इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्रज्ञान विभाग, फाईल क्रमांक १३(४)/२०२०-इजी- दोन ( खंड- पाच), दिनांक १६ एप्रिल, २०२१ नुसार, सुशासनासाठी आधार प्रमाणन (समाज कल्याण, नवसंशोधन, ज्ञान) नियम,२०२० (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त नियम " असा केला आहे) याच्या नियम ५ तसेच आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६ (२०१६ चा १८) (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ४ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ख) च्या उप-खंड (दोन) च्या अनुसार दस्तऐवज नोंदणीत अंतर्भूत असलेल्या पक्षकारांच्या ओळखीची पडताळणी करण्यासाठी स्वेच्छा तत्त्वावर, आधार प्रमाणनाचा वापर करण्याकरिता, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन या अंतर्गत असलेल्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागास मान्यता दिली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ख) च्या उप-खंड (दोन) आणि उक्त नियमाच्या नियम ५ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांनुसार, भारत सरकारने, याबाबतीत प्राधिकृत केलेले, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नोंदणी प्रणालीमधील दस्तऐवज नोंदणीमध्ये अंतर्भूत असलेल्या पक्षकारांच्या ओळखीची पडताळणी करण्याकरिता, इ-केवायसी सेवेसाठी स्वेच्छा तत्त्वावर, आधार प्रमाणन करण्यासाठी महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन या अंतर्गत असलेल्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला अधिसूचित करीत आहे :—

(१) आय सरिता,

(२) इ-नोंदणी (संमती–नि-परवाना) (लिव्ह अँड लायसन्स),

(३) इ-नोंदणी (प्रथम विक्री करारनामा) (फस्ट सेल अॅग्रीमेंट),

(४) इ-फायलिंग,

(५) विवाह नोंदणीची ऑनलाईन नोटीस.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीधर डुबे पाटील,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th March, 2022.

*NOTIFICATION*

AADHAAR (TARGETED DELIVERY OF FINANCIAL AND OTHER SUBSIDIES, BENEFITS AND SERVICES) ACT, 2016.

No. RGN-2020/481/C.R.No.245/M-1(Policy).— Whereas, the Government of India had *vide* it's Office Memorandum, Ministry of Electronics and Information Technology, File No.13(4)/2020-EG-II(Vol-V), dated the 16th April 2021, conveyed the approval of the Unique Identification Authority of India to the Department of Registration and Stamps under the Revenue and Forests Department, Government of Maharashtra, for using Aadhaar authentication, on voluntary basis, for verifying the identity of the parties involved in document registration, in terms of rule 5 of the Aadhaar Authentication for Good Governance (Social Welfare, Innovation, Knowledge) Rules, 2020 (hereinafter referred to as " the said Rules ") read with sub-clause *(ii)* of clause *(b)* of sub-section *(4)* of section 4 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 (18 of 2016) (hereinafter referred to as " the said Act ") ;

Now, therefore, in pursuance of the powers conferred by sub-clause *(ii)* of clause *(b)* of sub-section *(4)* of section 4 of the said Act and rule 5 of the said Rules, the Government of Maharashtra, being authorised by the Government of India in this behalf, hereby notifies the Department of Registration and Stamps under the Revenue and Forests Department, Government of Maharashtra to perform Aadhaar authentication, on voluntary basis, for eKYC services to verify the identity to the parties involved in document registration in the following Registration Systems, namely :—

(1) iSARITA,

(2) eRegistration (Leave and License),

(3) eRegistration (First Sale Agreement),

(4) eFiling,

(5) Online Notice of Marriage Registration.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIDHAR DUBE PATIL,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.